# रे. दि. मु. क्रमांक ९८/२०१५ मधील नि.क्र. ५५ खालील आदेश.
## रमेश तांबे व इतर -विरुध्द- अनंत तांबे व इतर
## आदेश पारित दिनांक १३.०१.२०२३

---

वादीतर्फे प्रस्तूतचा अर्ज मयत वादी क्र. ३ हिंमत पांडूरंग तांबे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीने सदर अर्जासोबत वादी क्र. ४ विकास हिंमत तांबे यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ५६ वर दाखल केले आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील वादी क्र. ३ हिंमत पांडूरंग तांबे या दिनांक २९.०३.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत वादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, वादी क्र. ३ हे मयत झाले त्यावेळी देशामध्ये कोरोना व्हायरस या महामारीचे प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करणेत आलेने वादी क्र. ३ चे वारसांना वकिलांची भेट घेवून तातडीने वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज देता आला नाही. त्यामुळे मयत वादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता उशीर झाला व त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश पारित करण्यात आला. त्यामुळे सदरचा अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळावा, अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तूत प्रतिवादी यांनी सदर अर्जावर असे म्हणणे दाखल केले आहे की, वादीने दिलेला अर्ज व त्यामधील मजकूर बरोबर नाही. वादीवर जास्तीत जास्त कॉस्ट बसवणेत यावी. उर्ज रद्द करणेत यावा.

०४. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे योग्य वाटते. तसेच, मयत वादी क्र. ३ हिंमत पांडूरंग तांबे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा

(abatement) हुकूम रद्द करणे न्यायोचित वाटते. परंतु, मयत वादी क्र. ३ हिंमत याचे वारसांना सदरचा अर्ज दाखल करणेस १० महिने २६ दिवसांचा विलंब झाला आहे. व त्यामुळे सदर प्रकरण लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे वादीस सदर विलंबाकरिता कॉस्टची आकारणी करणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टने योग्य होणार आहे. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र. ५५ चा अर्ज रक्कम रुपये १००/- (अक्षरी रक्कम रुपये दोनशे फक्त) इतक्या कॉस्टची आकारणीवर मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्टची रक्कम तालुका विधी सेवा समिती, खंडाळा येथे जमा करावी.

२. मयत वादी क्र. ३ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द करणेत येतो.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

(अ. क. दामटे)
दिनांकः- १३.०१.२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.